RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ५, अंक ७२]	मंगळवार, जून ४, २०१९/ज्येष्ठ १४, शके १९४१	[पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५.**

क्रमांक टीईएम-२०१९/प्र.क्र.३९/तांशि-४.—महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ (२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम २८) च्या कलम २३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन या द्वारे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१७ या नियमामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, जसे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), (सुधारित) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१७ (या पुढे या नियमास " मुख्य नियम " असे संबोधण्यात येईल) मधील नियम २, उप नियम (१), खंड (छ) मध्ये " हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान " याऐवजी " हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, नियोजन आणि फार्म डी " असे समाविष्ट करण्यात यावे.

३. मुख्य नियमातील नियम ८, उप नियम (३),—

(१) खंड (क) मध्ये,—

(*i*) उपखंड (एक) च्या परंतुकाऐवजी खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे , जसे :—

" परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) सीईटीमधील गणित विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(ख) सीईटीमधील भौतिकशास्त्र विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(ग) सीईटीमधील रसायनशास्त्र विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(घ) मंडळाच्या किंवा अर्हता परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित व रसायनशास्त्र या विषयातील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ड) एचएससी परीक्षेच्या गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(च) एचएससी परीक्षेच्या भौतिकशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(छ) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी." ;

(*ii*) उप नियम (३) खंड (क) मधील उपखंड (तिन) ऐवजी खालील उपखंडाचा समावेश करण्यात यावा, जसे :—

" पदविका उमेदवारासाठी,—पदविका उमेदवारांची गुणवत्ता यादी ही परीक्षा घेणाऱ्या प्राधिकरणाने ज्या परीक्षेतील गुणांच्या आधारे उमेदवाराला पदविका प्रदान केलेली आहे त्या परीक्षेतील उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या टक्केवारीच्या आधारे तयार करण्यात येईल :

परंतु, सारखेच गुण असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) एसएससी परीक्षेतील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ख) एसएससी परीक्षेतील गणित विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ग) एसएससी परीक्षेतील विज्ञान विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(घ) एसएससी परीक्षेतील इंग्रजी विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी.

(२) खंड (ग) , उपखंड (एक) च्या परंतुकाकरिता खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावे , जसे :—

"परंतु, सारखेच गुण किंवा प्राप्तांक असल्यास, उमेदवारांमधील सापेक्ष गुणवत्ता पुढील पसंतीक्रमाने व खाली विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने ठरविण्यात येईल,—

(क) सीईटीमधील गणित किंवा जीवशास्त्र विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(ख) सीईटीमधील भौतिकशास्त्र विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(ग) सीईटीमधील रसायनशास्त्र विषयातील अधिकतम गुण किंवा प्राप्तांक ;

(घ) मंडळाच्या किंवा अर्हता परीक्षेत भौतिकशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्र व रसायनशास्त्र या विषयातील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(ड) एचएससी परीक्षेच्या गणित किंवा जीवशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(च) एचएससी परीक्षेच्या भौतिकशास्त्र विषयातील गुणांची अधिकतम टक्केवारी ;

(छ) एचएससी परीक्षेतील एकत्रित गुणांची अधिकतम टक्केवारी".

४. मुख्य नियमातील नियम १०, उप नियम (१), मधील खंड (क) मध्ये,—

(१) टप्पा एक मध्ये,—

(*i*) उपखंड (क) नंतर खालील उपखंडाचा समावेश करण्यात यावा,जसे :—

"(क-१) आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांसाठी विचार करण्यात येईल अन्यथा जर त्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांच्यासाठी असलेल्या राखीव प्रवर्गात जागा उपलब्ध होत नसतील तर त्यांचा परस्पर गुणवत्तेच्या आधारे खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल.";

(*ii*) उपखंड (घ) आणि (ड) ऐवजी खालील उपखंडांचा समावेश करण्यात यावा, जसे :—

"(घ) विकलांग व्यक्ती प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्यासाठी राखीव असलेल्या त्यांच्या संबंधित प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल, संबंधित प्रवर्गातील अशा प्रकारच्या राखीव जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल ;

(ड) संरक्षण प्रवर्गातील उमेदवारांचा त्यांच्यासाठी राखीव असलेल्या त्यांच्या संबंधित प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार करण्यात येईल, संबंधित प्रवर्गातील अशा प्रकारच्या राखीव जागा त्यांच्या गुणवत्तेनुसार उपलब्ध होत नसतील तर, त्यांच्या परस्पर गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील जागा वाटपासाठी विचार केला जाईल " ;

(२) टप्पा -चार, टप्पा -पाच व टप्पा- सहा वगळण्यात यावा

५. मुख्य नियमातील नियम ११, खंड (३) मध्ये,

(*i*) उपखंड (क) मध्ये (दोन) ऐवजी खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावे , जसे :—

"(दोन) मुख्य नियमाच्या नियम १० मधील उप नियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-७; ";

(*ii*) उपखंड (ख ) मध्ये (एक) ऐवजी खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावे, जसे :—

"(एक ) मुख्य नियमाच्या नियम १० मधील उप नियम (१) मधील टप्पा-१ ते टप्पा-३ आणि टप्पा-७ ;".

६. मुख्य नियमाच्या नियम १२ मध्ये,—

(*i*) खंड (त्र) च्या ऐवजी खालील खंडाचा समावेश करण्यात यावा,जसे :—

"(त्र) सर्व प्रवेशित उमेदवारासाठी रु. १००० एवढे जागा स्वीकृती शुल्क असेल व हे शुल्क ना परतावा प्रक्रिया शुल्क म्हणून समजण्यात येईल ;"

(*ii*) खंड (ड) नंतर खालील कलमाचा समावेश करण्यात यावा, जसे:—

"(ढ) उमेदवाराने प्रवेश अर्जामध्ये प्रवेशासंबंधी केलेले कुठल्याही प्रकारचे विधान किंवा दिलेली माहिती वस्तुस्थितीशी विसंगत किंवा चुकीची असल्याचे कोणत्याही वेळी आढळून आल्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य अशा उमेदवाराचा प्रवेश रद्द करतील आणि त्याचे शुल्क जप्त करतील. प्रवेश रद्द केल्याच्या विरोधात उमेदवारास सक्षम प्राधिकारी यांचेकडे सात दिवसाच्या आत अपील करता येईल. अशा प्रकारच्या अपिलावर सक्षम प्राधिकारी शक्यतो १५ दिवसाच्या आत निर्णय देतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(ण) बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याबाबतच्या प्राप्त तक्रारींची ठराविक कालमर्यादेत चौकशी करण्यात येईल व चौकशीनंतर तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास असे प्रवेश रद्द करण्यात येतील. त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांना सूचित करून करण्यात येईल."

७. मुख्य नियमाच्या नियम १५ मध्ये , खंड (ग) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात यावे, जसे:—

"(घ) कोणत्याही वेळी प्रवेश रद्द करण्यास इच्छुक उमेदवाराकडून अभ्यासक्रमाच्या पुढील वर्षाचे शुल्क वसूल करण्यास संस्थाना अधिकार नसतील.".

८. मुख्य नियमास जोडलेली अनुसूची-दोन, मधील खंड-(एक) ऐवजी, खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात यावा, जसे :—

"(एक)- अनुषंगिक प्रवेशाच्या जागा - समुचित प्राधिकरणाने विहित केलेल्या मानकानुसार असतील. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रोहिणी भालेकर,**
शासनाच्या उप सचिव.

**HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 4th June 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSIONS AND FEES) ACT, 2015.

No.TEM-2019/C.R.39/TE-4.—In exercise of the powers conferred by section 23 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2015 (Mah. XXVIII of 2015), the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Technical Courses) Rules, 2017, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Technical Courses) (Amendment) Rules, 2019.

2. In rule 2 of the Maharashtra Unaided Private Professional Educational Institutions (Regulation of Admission to the Full Time Professional Undergraduate Technical Courses) Rules, 2017 (hereinafter referred to as "the principal rules"), in clause *(g)*, for the words "and Hotel Management and Catering Technology" the words, " Hotel Management and Catering Technology, Planning and Pharm. D. " shall be substituted.

3. In rule 8 of the principal rules, in sub-rule *(3)*,—

*(1)* in clause *(a)*,—

*(i)* for proviso to sub-clause *(i)*, the following proviso shall be substituted, namely:—

"Provided that, in case of tie, the relative merit of Candidates shall be resolved in the following order of preference and methodology as specified below,—

*(a)* higher marks or score in Mathematics at CET ;

*(b)* higher marks or score in Physics at CET ;

*(c)* higher marks or score in Chemistry at CET ;

*(d)* higher percentage of marks in Board or qualifying examination for Physics, Mathematics and Chemistry taken together ;

*(e)* higher percentage of marks in the subject Mathematics at HSC ;

*(f)* higher percentage of marks in the subject Physics at HSC ;

*(g)* higher percentage of marks in Aggregate at HSC." ;

*(ii)* for sub-clause *(iii)*, the following sub-clause shall be substituted, namely :—

*"(iii)* For Diploma Candidates.- The merit list of Diploma Candidates shall be prepared on the basis of percentage of marks obtained by the Candidate, on the basis of which Diploma is awarded by the examining authority :

Provided that, in case of tie, the relative merit of different Candidates shall be resolved in the following order of preference and methodology as specified below,—

*(a)* higher percentage of marks in SSC;

*(b)* higher percentage of marks in Mathematics at SSC;

*(c)* higher percentage of marks in Science at SSC;

*(d)* higher percentage of marks in English at SSC.";

*(2)* in clause *(c),* for proviso to sub-clause (*i*), the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, in case of tie, the relative merit of different Candidates shall be resolved in the following order of preference and methodology as specified below, -

*(a)* higher marks or score in Mathematics or Biology at CET;

*(b)* higher marks or score in Physics at CET;

*(c)* higher marks or score in Chemistry at CET;

*(d)* higher percentage of marks in Physics, Mathematics or Biology and Chemistry added together at Board or qualifying examination ;

*(e)* higher percentage of marks in the subject Mathematics or Biology at HSC;

*(f)* higher percentage of marks in the subject Physics at HSC;

*(g)* higher percentage of marks in aggregate in HSC.".

4. In rule 10 of the principal rules, in sub-rule *(1)*, in clause (a),—

*(1)* in Stage – I,

*(i)* after sub-clause *(a),* the following sub-clause shall be inserted, namely:-

*"(a-1)* Economically Weaker Section (EWS) and Orphan Candidates shall be considered for allotment of seats reserved for them as per their *Inter-Se-Merit,* and if seat is not available in their reserved category, then they shall be considered for allotment in Open Category as per the *Inter-Se-Merit*.";

*(ii)* for sub-clauses *(d)* and *(e),* the following sub-clauses shall be substituted, namely:—

*"(d)* Persons with Disability Category Candidates shall be considered for allotment of the seat reserved for them in their respective category, as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective reserve Category is not available, then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se- Merit* .

*(e)* Defence Category Candidates shall be considered for allotment of the seats reserved for them in their respective Category as per their *Inter-Se-Merit* and if seat in their respective reserve Category is not available then they shall be considered for allotment in Open Category as per their *Inter-Se-Merit*.";

*(2)* the Stage – IV , Stage –V and Stage – VI shall be deleted.

5. In rule 11 of the principal rules, in clause (3),

*(i)* in sub-clause *(a),* for entry *(ii),* the following shall be substituted, namely:—

"(*ii*) Stages I to VII of sub-rule *(1)* of rule 10;";

*(ii)* in sub-clause *(b),* for entry *(i)*, the following shall be substituted, namely :—

*"(i)* Stages I to III and Stage VII of sub-rule *(1)* of rule 10;".

6. In rule 12 of the principal rules,—

*(i)* for clause *(j)*, the following shall be substituted, namely :—

*"(j)* The seat acceptance fee shall be Rs. 1000/-, for all admitted candidates and the same shall be treated as non-refundable processing fee;";

*(ii)* after clause *(m),* the following clauses shall be added, namely :—

*"(n)* If any of the statement made in application form or any information supplied by the candidate in connection with his admission is found to be false or incorrect in any material particular, the Principal shall cancel his admission and forfeit the fees. An appeal against the action of cancellation of admission, may be preferred within seven days to the Competent Authority. The Competent Authority shall, preferably, decide the appeal within fifteen days and his decision thereon shall be final.

*(o)* Complaints regarding the use of fake certificates shall be investigated in time bound manner and if it is found that there is a truth in such complaint, such admission shall be cancelled. Further appropriate action shall be initiated with due intimation to Competent Authority.".

7. In rule 15 of the principal rules, after clause *(c)*, the following clause shall be added, namely :—

*"(d)* The institution shall not entitle to recover the fees for the subsequent years from the student seeking cancellation of his admission at any point of time.".

8. In SCHEDULE-II, appended to the said principal rules, for clause *(i)*, the following clause shall be substituted , namely :—

*"(i)* Lateral Entry Seats: As per the norms of appropriate authority.".

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ROHINI BHALEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.